क्रमांक : ६७२१/क-१,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई.
दिनांक : २५ मार्च, २०२२

संदर्भ :- या सचिवालयाचे परिपत्रक क्रमांक क्र.३३७२/क-१, दिनांक २८ फेब्रुवारी, २०२२

**:: कार्यालयीन आदेश ::**

शुक्रवार, दिनांक २५ मार्च, २०२२ रोजी समाप्त होणाऱ्या विधानमंडळाच्या प्रथम (अर्थसंकल्पीय) अधिवेशन कालावधीत या सचिवालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी केलेल्या अतिरिक्त कामाचा विचार करुन, या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांना **सोमवार, दिनांक २८ मार्च, २०२२** रोजी सुट्टी देण्यात येत आहे.

मंगळवार, दिनांक १ मार्च, २०२२ रोजी महाशिवरात्रीनिमित्त सार्वजनिक सुट्टी असली तरी RT-PCR चाचणी करण्याकरीता तसेच शनिवार, दिनांक ५ मार्च, २०२२ या शासकीय सुट्टीच्या दिवशी सभागृहाची बैठक आयोजित केली असल्याने कार्यालय सुरू ठेवण्यात आले होते. या दिवशी कार्यालयात उपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना उक्त दोन्ही दिवसांची बदली रजा **दिनांक ३१ मार्च, २०२३** पर्यंत वरिष्ठांच्या पूर्व परवानगीने उपभोगता येईल.

दिनांक १ मार्च, २०२२ रोजीपासून अधिवेशन कालावधीत कार्यालयात परवानगीशिवाय / पूर्वपरवानगीने अनुपस्थित राहिलेल्या अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात हजर होण्याच्या वेळी RT-PCR कोरोना चाचणी निगेटिव्ह असल्याचे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहिल. सदरहू प्रमाणपत्र सादर केल्याशिवाय अनुपस्थित अधिकारी/कर्मचारी यांना कार्यालयात हजर करुन घेतले जाणार नाही.

आदेशानुसार,
**( सुभाष नलावडे )**
अवर सचिव,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**प्रति,**

१) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांचे सचिव.
२) मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

..२/-

३) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद व मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा यांचे खाजगी सचिव तथा जनसंपर्क अधिकारी.

४) प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांचे कार्यालय.

५) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.

६) मुख्य सुरक्षा अधिकारी, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) सर्व मा.समिती प्रमुख यांचे कार्यालय.

८) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष.

१०) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कर्मचारी.

११) व्यवस्थापक उपहारगृह, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१२) निवडनस्ती.

**प्रतिलिपी :-**

१) सह सचिव (समिती) तथा विशेष कार्य अधिकारी (श्री.अ.शं.महाजन), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

२) उप सचिव (श्री.वि.गो.आठवले) व उप सचिव (श्रीमती मे.दि.तळेकर), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय यांना विनंती करण्यात येत आहे की, त्यांनी सुट्टीच्या दिवशी सदस्यांच्या प्रवास भत्त्याची देयके व रेल्वे कूपन्स देण्याची व्यवस्था करावी.

३) उप सचिव (श्री.ऋ.ज.कुडतरकर), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

४) उप सचिव तथा नियंत्रण अधिकारी (श्रीमती स्वा.स.ताडफळे), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

५) अवर सचिव (श्री.सं.ना.पराडकर), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

६) अवर सचिव (श्री.र.ग.जगदाळे), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

७) पध्दती विश्लेषक (श्री.अ.अ.सर्वणकर), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

८) कक्ष अधिकारी, ('ग-१' कक्ष), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

९) कक्ष अधिकारी तथा मालमत्ता व्यवस्थापक ('ग-२' कक्ष), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

१०) कक्ष अधिकारी, 'ह' कक्ष (विधानमंडळ सदस्यांचे वेतन व भत्ते आणि रेल्वे कुपन वैद्यकीय खर्च प्रतिपूर्ती व निवृत्तीवेतन), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय.

**टीप :- सोमवार, दिनांक २८ मार्च, २०२२ रोजी 'क-१' (आस्थापना) कक्ष, 'क-२' (संगणक) कक्ष, 'क-३' (लेखा) कक्ष, 'क-४' (अर्थसंकल्प) कक्ष, 'ग-१' (सामान्य) कक्ष, 'ग-२' कक्ष व 'ह' कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांची उपस्थिती अनिवार्य राहील. उक्त कक्षातील अधिकारी/कर्मचारी यांना त्या दिवसाची बदली सुट्टी त्यांच्या विनंतीनुसार देय राहील.**